# कार्यकारी अभियंता,
# मार्ग विकास विभाग क्रं. ४,
# अंधेरी , मुंबई ४०० ०५८.

**ई मेल- eerdd4mum@mahapwd.com**

# *नागरीकांची सनद*

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## महाराष्ट्र शासन

# सुची


| अ. क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | **१** |
| २ | मार्ग विकास विभाग क्रं. ४, अंधेरी विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी | **३** |
| ३ | कार्यालयाची रचना | **५** |
| ४ | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | **६** |
| ५ | विभागीय कार्यक्षेत्रातील सुरक्षितता | **६** |
| ६ | गाऱ्हाण्याचे निराकरण सनदेचा आढावा जनसामान्यांच्या सुचना | **७** |
| ७ | नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी | **८** |
| ८ | परिशिष्ठ ‘अ’,‘ब’ व ‘क’ | **९ ते ११** |

## १. प्रस्तावना :-

अधीक्षक अभियंता मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर अंतर्गत सन १९८५ पासून मार्ग विकास विभाग क्र.४ अंधेरी. मुंबई हे कार्यालय कार्यरत आहे. या विभागाअंतर्गत बहुमजली इमारती बांधकाम उप विभाग क्र.३, बांद्रा, मुंबई रस्ते बांधकाम उपविभाग क्र.१०, कलानगर, बांद्रा, मार्ग विकास उप विभाग क्र.१० व १२ अंधेरी, ठाणे खाडी पूल उपविभाग क्र.१ कलानगर, बांद्रा असे उपविभाग आहेत.

पश्चिम द्रुतगती महामार्गाची देखभाल व दुरुस्तीचे तसेच सुधारणा इत्यादी कामे करणे. ही कामे या विभागाच्या अखत्यारित येतात. मार्ग विकास विभाग क्र.४ अंधेरी हे कार्यालय कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.४, नवीन प्रशासकीय इमारत, ३रा माळा, भवन्स कॉलेजजवळ, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५८ येथे कार्यरत असून हे कार्यालय नागरीकांशी बांधिलकी जपण्यास कटिबध्द आहे. ही बांधिलकी या सनदेव्दारे हे कार्यालय जाहीर करत असून याची जबाबदारी स्विकारीत आहे. हा विभाग पुढे दिलेल्या सुविधा पुरविण्यास बांधिल आहे. सार्वजनिक विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तप्तरतेने सौजन्यपुर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेवून तसेच सर्वसामान्य नागरीकांसाठी ही सनद तयार करण्यांत आली आहे.

## मार्ग विकास विभाग क्र.४ अंधेरी या कार्यालयाकडून पुरविण्याच्या सुविधा.

१) हया विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या पश्चिम द्रुतगती महामार्गाची नियतकालीक देखभाल व दुरूस्ती उपलब्ध निधीतून प्रभाविपणे करणे.

२) हया विभागीय कार्यालयात व अखत्यारितील प्रत्येक कार्यालयात सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्याचे निवारण करणे.

३) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत हया विभागाच्या अखत्यारितील मागितलेली माहिती संबंधीतांना विहित मुदतीत उपलब्ध करून देणे.

४) कार्यालयाच्या कामाकाजात सातत्य ठेवून कार्यपध्दतीत आधुनिकीकरण करणे.

५) संगणकीकरणाबाबत हया विभागाच्या अंतर्गत कार्यालयांना अवगत करणे व प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

६) हया विभागाअतंर्गत आवश्यक व अद्ययावत विविध माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्ययावत करणे.

७) कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

८) नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

२. **<u>मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी या कार्यालयाची बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी.</u>**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना मार्ग विकास विभाग क्रं.४ अंधेरी, मुंबई हे कार्यालय,

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील, यासाठी वेळोवेळी विविध प्रमाणपत्र / ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठीची कार्यपध्दती/ पत्रके नागरीकांच्या माहीतीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

**<u>नागरीकांची जबाबदारी</u>**

अ) शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणुक सौजन्यपुर्वक असावी.

ब) नागरीकाकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपुर्णरित्या मिळावी.

क) नागरीकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

ड) विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरू नये.

इ) नागरीकांनी कायदेशीर तरतूद, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

ई) नागरीकांनी सार्वजनिक हीत, एकात्मता व अखंडता जोपसण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## ३. मार्ग विकास विभाग क्र.४, कार्यालयाची रचना

अधीक्षक अभियंता मुंबई बांधकाम मंडळ चेंबुर, अंतर्गत सन १९८५ पासून मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, हे विभागीय कार्यालय अंधेरी, मुंबई ५८ येथे कार्यरत आहे

या विभागांतर्गत बहुमजली इमारती बांधकाम उप विभाग क्र.३ कलानगर बांद्रा, मार्ग विकास उप विभाग क्र.१० व १२ अंधेरी, मुंबई रस्ते बांधकाम उपविभाग क्र.१०, कलानगर बांद्रा व ठाणे खाडी पुल उपविभाग क्र.१ कलानगर बांद्रा, असे उपविभाग येत असून त्यांचेकडे पश्चिम दुतगती महामार्ग यांची देखभाल व दुरुस्तीची कामे व रस्त्याचा संभाग विकसीत करणे हे कार्यक्षेत्रे येतात.

कार्यकारी अभियंता यांचे अधिपत्याखालील ५ उप विभाग कार्यरत आहेत. कार्यकारी अभियंता यांचे क्षेत्राचा नकाशा परिशिष्ट " ब " व मुख्यालये दर्शविणारा तक्ता (Tree chart) परिशिष्ट " अ " म्हणून सोबत जोडला आहे.

हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, १९६४, लेखा संहिता, १९८४, विनिर्देश, निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्याकडून केले जाते.

## ४. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र

हया विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र, मुंबई आहे. या विभागांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गाची देखभाल व दुरुस्ती माध्यमातून विकसीत करणेचे काम येते.

## ५. विभागीय क्षेत्रातील सुरक्षितता

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन अपघात प्रवण स्थळ शोधून अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

या विभागाअंतर्गत असलेला पश्चिम द्रुतगती महामार्गाची वाहतुक व सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती केली जाते जेणेकरुन सदर वाहतुकीस सर्वांना सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

## ६. गाऱ्हाण्याचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्याच्या सुचना.

अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण

विभागाबाबत अथवा कामाबाबत तक्रारी असतील तर त्यासाठी नागरीकांनी ज्या विशीष्ट कार्यालया विरुध्द गाऱ्हाणे / तक्रारी असतील त्या कार्यालयाच्या वरीष्ठ कार्यालय, कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे / तक्रार नोंदवावी. विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रारी असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे / तक्रार नोंदवावी अशा गाऱ्हाणी / तक्रारी निवारण या कार्यालयाकडून ७ दिवसांत करण्यांत येईल. गाऱ्हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रारपेटी ठेवण्यात येत आहे. गाऱ्हाणी समक्ष भेट / पत्राने वा '' इ '' मेलव्दारे नागरीक मांडू शकतात.

ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

हया विभागाच्या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा मार्ग विकास विभाग क्रं.४ अंधेरी, मुंबई अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यांत येईल.

क) जन सामान्यांकडून सुचना

हया विभागाची ही नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात केलेली सुधारणा घडवून आणता येईल ही नागरीकांची सनद स्वतःहून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही. ती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरीकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ७. <u>नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हया विभागाच्या नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी दि. १ मे, २००९ पासून करण्यास विभाग कटीबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देवून नागरीकांच्या प्रतिक्रीया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा आदर करुन आवश्यक बदल करण्यांत येईल, नागरीकांना सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल, भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल, तसेच नागरीकांच्या गाऱ्हाण्याचे निराकरण करण्यांत येईल.

## ८. <u>परिशिष्ठ अ</u>

मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता. (Tree chart)

**कार्यकारी अभियंता,**
**मार्ग विकास विभाग क्र.४,**
**अंधेरी.**

↓

**उपकार्यकारी अभियंता**

↓

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उपविभागीय अभियंता, मार्ग विकास उपविभाग क्र.१०, अंधेरी. | उपविभागीय अभियंता, मार्ग विकास उपविभाग क्र.१२,अंधेरी. | उपविभागीय अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम उपविभाग क्र.३, कलानगर, बांद्रा. | उपविभागीय अभियंता, ठाणे पूल उपविभाग क्र.१, कलानगर, बांद्रा. | उपविभागीय अभियंता, मुंबई रस्ते बांधकाम उपविभाग क्र.१०, कलानगर, बांद्रा. |




# दर्शक नकाशा

मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी.

- विभागीय कार्यालय असे दर्शविले आहे............
- उप विभागीय कार्यालय असे दर्शविले आहे.(५)..
- अंतर्गत रस्ते असे दर्शविले आहे ................

**WESTERN EXPRESS HIGHWAY**
**FROM BANDRA (Km. 527 / 680) TO**
**DAHISAR CHECK NAKA (Km. 502 / 350)**
**TOTAL LENGTH 25.33Kms.**

NOTES:-

1. WESTERN EXPRESS HIGHWAY SHOWN THUS...
2. FLY OVER BRIDGES SHOWN THUS.....................
3. UNDERPASS / SUBWAY SHOWN THUS...............

EXECUTIVE ENGINEER
ROAD DEVELOPMENT DIVISION No. IV
ANDHERI,MUMBAI

**परिशिष्ठ ‘क’**

**कार्यपुर्तीचे वेळापत्रक**

| अ.क्रं | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपुर्तीची कालावधीमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | पथकिनारवर्ती नियमांतर्गत महामार्गाच्या कडेस बांधावयाच्या इमारतींकरिता ना-हरकत प्रमाणपत्र<br>अ) विहित इमारत रेषेबाहेर<br>ब) विहित इमारत रेषेच्या आत | <br><br><br>कार्यकारी अभियंता<br>शासन | <br><br><br>१५दिवस<br>१५ दिवसांत वरिष्ठ कार्यालयास सादर. |
| २ | महामार्गाच्या हद्दीत ओ.एफ.सी. केबल टाकण्यास परवानगी. | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयात सादर. |
| ३ | महामार्गाच्या हद्दीत इतर सेवा वाहिन्या टाकण्यास परवानगी. | मुख्य अभियंता | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयात सादर. |
| ४ | महामार्गाच्या हद्दीत जाहिराती फलके लावण्यास परवानगी. | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयात सादर. |
| ५ | अंदाजपत्रके तयार करणे. | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ६ | अंदाजपत्रकास मान्यता देणे. | कार्यकारी अभियंता | १० दिवस |
| ७ | कंत्राटदारांची देयके अदा करणे. | कार्यकारी अभियंता | ५ दिवस (अनुदान उपलब्धतेच्या अधिन) |